# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./६०७६/२०२१ दि. ०५/०७/२०२१

## परिपत्रक

विषय:- कोव्हिड-१९ आजाराची चाचणी करणेबाबत.

संदर्भ:- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. जिका/क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि- ९८३/२०२१, दि. २३/०६/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याव्दारे कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचा(कोव्हीड-१९) वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी केंद्र शासन, राज्य शासन तसेच स्थानिक प्रशासनामार्फत उपाय व मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत. कोव्हिड-१९ आजाराची दुसरी लाट ओसरलेली असून तिसऱ्या लाटेच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने सर्व शासकीय / निमशासकीय व बिगर शासकीय संस्थांमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांचेमार्फतीने त्यांची चमू (टीम) कोव्हिड-१९ आजाराची चाचणी / तपासणी करण्यासाठी कटीबध्द असताना कार्यालयांमध्ये सदर चाचणी करतेवेळेस पाहिजे तसे आरोग्य विभागास सहकार्य लाभत नसल्याचे मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे निदर्शनास आल्याचे संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे.

करीता कोव्हिड-१९ आजाराची तिसऱ्या लाटेच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात चाचणी / तपासणी करण्याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांचेमार्फतीने त्यांची चमू (टीम) आल्यास आपण त्यांना संपूर्ण सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त शिक्षक व अधिकारी /कर्मचारी यांना प्रोत्साहीत करावे व त्याबाबतचा अहवाल अविलंब वेळोवेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली व विद्यापीठास सादर करावा.

**संलग्न:-** संदर्भिय पत्राची प्रत.

मा. कुलगुरु महोदयांचे आदेशान्वये,

५/७/२०२१

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचना करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. उपकुलसचिव, आस्थापना व प्रशासन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. मा. जिल्हाधिकारी यांचे स्विय सहाय्यक, गडचिरोली

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-442605
▸ टोल फ्री क्रमांक :1077 ▸ हॉटलाईन क्र.: 2007 ▸ दूरध्वनी क्र.: 07132-222031,
▸ मोबाईल क्र.: 9423911077 ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यक/कावि-983 /2021 दिनांक : 23 जुन, 2021..

प्रति,

---------------------------------

--------------------------------

(सर्व कार्यालय प्रमुख/यंत्रणा) जिल्हा गडचिरोली.

विषय- सर्व शासकीय, निमशासकीय व बिगर शासकीय संस्थांमध्ये कोविड-19 आजाराची चाचणी करण्याबाबत.

संदर्भ- जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांचे कार्यलयीन पत्र क्रमांक 6014/2021 दिनांक 23.06.2021

उपरोक्त विषयांकीत संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोविड-19 आजाराची दुसरी लाट ओसरलेली असून आपण तिसऱ्या लाटेची पूर्वतयारी करत करीत असून वेळेत टेस्टिंगव्दारे रोगनिदान झाल्यास जन-सामान्यांत आजाराचा परत प्रादुर्भाव होत आहे किंवा कसे, हे वेळेत ओळखता येईल. या करिता सर्व शासकीय निमशासकीय व बिगर शासकीय संस्थामध्ये कोविड-19 आजाराची तपासणी करण्यासाठी कटीबध्द आहेत परंतु कार्यालयांमध्ये सदर चाचणी करतेवेळेस पाहिजे तसे आरोग्य विभागास सहकार्य लाभत नसल्याचे माझे निदर्शनास आले आहे. जी अत्यंत गंभीर बाब आहे.

त्याअनुषंगाने आपणास निर्देशित करण्यात येते की, कोविड-19 आजाराची तिसऱ्या लाटेची पुर्वतयारी करीता जर आपले कार्यालयात टेस्ट करण्याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांचे मार्फतीने त्यांची टिम आल्यास आपण त्यांना संपूर्ण सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहीत करण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल अविलंब वेळोवेळी या कार्यालयास सादर करण्यात यावा.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली

प्रतिलिपी- जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांना माहितीस तथा संदर्भिय पत्राचे अनुषंगाने उचित कार्यवाहीस अग्रेषित.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली

Scanned with CamScanner